# घटना समिती – महाराष्ट्र युक्रांद

## :निवेदन:

लोणावळा येथील जून १९७७च्या शिबिरामध्ये ठरविल्याप्रमाणे त्याच शिबिराने नेमलेल्या घटनासमितीने युवक क्रांती दलाकरिता घटना बनविण्यासाठी आवश्यक ती प्राथमिक पावले टाकली. या संबंधात घटनासमितीने युक्रांदची विविध युनिटस् व कार्यकर्ते यांची मते अनौपचारिकपणे, खुलेपणाने जाणून घेतली. त्यात व्यक्त झालेल्या सर्व विचारप्रवाहातून आम्हाला मोलाचे मार्गदर्शन झाले.

घटना ही आपली संघटना अधिक परिणामकारक, सुसंघटित व कार्यशील बनविण्याच्या निरंतर प्रक्रियेचे साधन व्हावे, व ती कार्यहानी करून विसंवाद उत्पन्न करणारे यंत्र बनू नये अशी सर्वांचीच धारणा दिसली. घटना ही कार्यकर्त्यांच्या शिस्तबद्ध उत्साहावर व स्वयंप्रेरित पुढाकारावर (initiative) विरजण घालणारी चौकट किंवा सापळा बनू नये असाच विचारांचा एकूण कल होता. घटना समितीला हे विचार बरोबरच वाटले.

या दृष्टीने युक्रांद अनुभवाच्या मुशीतून ज्या पद्धतशीरपणे व संगतवार रीतीने अधिकाधिक शिस्तबद्ध होत असल्याचा अनुभव संघटनेला व कार्यकर्त्यांना मिळत आहे, त्या प्रक्रियेत आपण एकदम खंड पाडू नये असेच सर्वसाधारण मत असल्याचे घटनासमितीला जाणवले. युक्रांदच्या कार्यशीलतेला धक्का न लावता तिचे सामर्थ्य वाढविण्यासाठी कायम स्वरूपाची घटना करण्याची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने, पूर्ण लोकशाही मार्गाने पार पाडावी असे आमचेही मत आहे.

या दृष्टीने कोणतीही घटना संपूर्ण व तपशीलवार बनविण्याच्या प्रक्रियेचा गाभ्याचा भाग म्हणजे निर्णयप्रक्रियेत ज्यांचा समावेश करावाच लागेल अशा युक्रांदच्या सामान्य व पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या व्यवच्छेदक कसोट्या ठरविणे हा आहे असे आमच्या लक्षात आले. एकदा युक्रांदचा सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणजे कोण याची रेखीव व्याख्या झाली व ती अनुभवाने मूळ संकल्पाला पोषक अशीच आहे हे सिद्ध झाले म्हणजे त्या पायावर घटना उभारणे हे संघटनेला केव्हाही सुलभ ठरेल. म्हणून याविषयीही आम्ही संघटनेतील विविध कार्यकर्त्यांच्या मतांचा कानोसा घेतला.

या कसोट्या व आजवर आपण उभारलेल्या संघटनेचे तीन आधार किंवा घटक, म्हणजे वार्षिक शिबिर, प्रतिनिधी सभा व ~~वार्षिक शिबिर~~ केंद्रीय कार्यकारिणी यांचे कामकाज, यांचा एक शिस्तबद्ध व सुसंवादी मिलाफ जर आपण काही काळ घडवला, अनुभवला, तर त्यावरून योग्य ते निष्कर्ष काढून आपल्याला पुढील वाटचाल करता येईल.

तेव्हां कार्यकर्त्यांचे निकष आम्ही खाली नमूद करत आहोत. हे निकष पुरे करणारे युक्रांदचे सारे सभासद यापुढे वरील निकषांच्या संदर्भात अधिकाधिक शिस्तबद्ध व कार्यशील संघटना बांधण्याच्या दृष्टीनेच वागण्याचा दृढसंकल्प या शिबिराच्या निमित्ताने ठराशी बाळगतील; व युक्रांदकरिता कालानुरूप पक्की घटना बनविण्याच्या दृष्टीने पुढचे पाऊल उचलतील, अशी आमची खात्री आहे.

हे निकष ठरविताना जून '७७ मधील लोणावळा येथील युक्रांदची बैठक ते मे '७८ हा काळ नजरेसमोर ठेवला आहे.

## सामान्य कार्यकर्त्यांचे निकष :–

१. युवक क्रांती दलाची मूलभूत भूमिका मान्य असलेला व युक्रांदला संपूर्णपणे बांधिलकी असलेला सभासद

२. कोणत्याही राजकीय पक्षाचा वा संघटनेचा सदस्य नसलेला सभासद

३. युनिटच्या दैनंदिन कामकाजात व आयोजित कार्यक्रमात सहभाग घेणारा सभासद —– युनिटच्या एकूण बैठकींपैकी ५० % बैठकीला किंवा वर्षभरात एकूण किमान २५ बैठकींना (यापैकी जी लहान संख्या असेल ती ग्राह्य) उपस्थित रहाणारा सदस्य

४. मध्यवर्ती केंद्राने किंवा युनिटने आयोजित केलेल्या किमान एका प्रशिक्षण शिबिराला उपस्थित राहिलेला सभासद किंवा युनिटमध्ये वर्षभरात झालेल्या एकूण अभ्यासवर्गांपैकी २५% वर्गांना उपस्थित राहिलेला सभासद.

युक्रांदने घालून दिलेल्या शिस्तीचे पालन करणाऱ्या व कार्यकर्त्यांमध्ये ज्याच्याविषयी शंका नाही अशा वरील सभासदांस युवक क्रांती दल आपला 'सामान्य कार्यकर्ता' म्हणून मान्यता देईल.

## पूर्णवेळ कार्यकर्ता :–

युवक क्रांती दलाचे पूर्णवेळ कार्यकर्ते हेच संघटनेचे खरे-खुरे आधारस्तंभ असतात.

मूलभूत भूमिकेविषयी स्पष्टता, राजकीय परिपक्वता, जाण, त्याच्याकडून अपेक्षित आहे.

वर्गीय आणि जातीय जाणिवा संपूर्णपणे सोडून देऊन (declass & decaste) दलित-श्रमिकांच्या जाणिवांशी त्याने समरस होणे अत्यावश्यक असते. व्यक्तिगत चारित्र्य, दलित - श्रमिक जनतेविषयी मनात कमालीचा आदर हा त्याच्याकडून अपेक्षित असतो. खाजगी आणि सार्वजनिक जीवन असे दोन कप्पे पूर्णवेळ कार्यकर्त्याच्या जीवनात असतीलच असं नाही. कमालीची सहनशीलता (patience), संघटनेचा सर्वांगीण विचार करण्याची कुवत, निर्भयता, संघटना सांगेल ते काम स्वीकारण्याची तयारी, समोरची आव्हाने झेलण्याची जिद्द अशा कार्यकर्त्याकडून अपेक्षित असते.

युवक क्रांती दलाचा पूर्णवेळ कार्यकर्ता होण्याचे निकष व पद्धती पुढीलप्रमाणे देत आहोत :

१. महाराष्ट्र युक्रांदचा पूर्णवेळ कार्यकर्ता होऊ इच्छीणाऱ्याने युक्रांदचा सामान्य सदस्य म्हणून एखाद्या युनिटमध्ये किमान तीन वर्षे काम केले असले पाहिजे.

२. त्याने आपले, युक्रांदचा पूर्णवेळ कार्यकर्ता होण्याची इच्छा व्यक्त करणारे निवेदन, दोन पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या शिफारसपत्रांसह युक्रांदच्या केंद्रीय कार्यकारिणीला लेखी सादर करावे.

३. ते निवेदन केंद्रीय कार्यकारिणीने स्वीकारल्यापासून किमान एक वर्ष

उमेदवारीचा काळ राहील.

४. या उमेदवारीच्या काळात त्या कार्यकर्त्यावर निरीक्षक म्हणून एक किंवा अधिक पूर्णवेळ कार्यकर्त्यांची नेमणूक संघटना करेल.

५. या उमेदवारीकाळात त्या कार्यकर्त्यास संघटनेने ठरविलेले मानधन संघटनेकडून आणि केवळ संघटनेकडून मिळेल.

६. उमेदवारीकाळ संपताच निरीक्षक आपापले लेखी अहवाल केंद्रीय कार्यकारिणी किंवा तत्सम नियुक्त समितीपुढे सादर करतील.

७. त्या उमेदवाराच्या गैरहजेरीत ती कार्यकारिणी किंवा समिती त्या अहवालांवर सांगोपांग चर्चा करेल. त्या कार्यकारिणी किंवा समितीमध्ये त्यावर एकमताने किंवा कार्यकारिणीच्या सदस्यसंख्येच्या 2/3 किंवा अधिक बहुमताने जो निर्णय घेतला जाईल तो त्या उमेदवारास लेखी स्वरूपात कार्यकारिणीमार्फत कळविला जाईल.

८. या निर्णयावर तो उमेदवार कार्यकारिणीकडे आपले मत नोंदवू शकतो व त्यावर चर्चा घडवून आणू शकतो.

९. कार्यकारिणीने उमेदवारास पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून मान्यता देताच त्याला महाराष्ट्र युवकांच्या पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून ओळखले जाईल.

१०. संघटना सांगेल त्या ठिकाणी जाऊन सांगेल ते काम तो पूर्णवेळ-कार्यकर्ता करील.

संघटनेच्या निर्णयप्रक्रियेचे तीन आधार—

१. वार्षिक शिबीर 2 प्रतिनिधी सभा 3 केंद्रीय कार्यकारिणी

१. वार्षिक शिबीर — संघटनेच्या सर्व कार्यकर्त्यांचे वार्षिक शिबीर सर्वसाधारणपणे वर्षातून एकदा भरेल. या शिबिराची जागा व निश्चित वेळ केंद्रीय कार्यकारिणी ठरवेल. शिबिरात सामान्यपणे पुढील कामकाज केले जाईल.

१) गेल्या वर्षातील कार्यक्रमाचा — युनिट्सचा, पूर्णवेळ कार्यकर्त्यांचा व संघटनेचा — अहवाल

२) गेल्या वर्षातील विविध धोरणांवर चर्चा

३) पुढील वर्षातील धोरण व कार्यक्रम यासंबंधी विचार

४) संघटनेच्या रचनेसंबंधी विचार

५) नवीन वर्षासाठी कार्यकारिणीची निवड — नव्या कार्यकारिणीची सूचना प्रतिनिधीसभेमार्फत केली जाईल.

२. प्रतिनिधी सभा — पुढे नमूद केलेले कार्यकर्ते प्रतिनिधीसभेचे सदस्य राहतील.

१) केंद्रीय कार्यकारिणीचे सर्व सदस्य.

२) वरील सदस्य वगळून प्रत्येक युनिटने सुचवलेले कमाल तीन सामान्य कार्यकर्ते — यातील किमान एक कार्यकर्ता युनिट कार्यकारिणीचा सदस्य असेल.

३) केंद्रीय कार्यकारिणीने निमंत्रित केलेल्या व्यक्ती व कार्यकर्ते. अशा निमंत्रितांची संख्या प्रतिनिधी सभेच्या एकूण संख्येच्या 1/10 पेक्षा जास्त नसावी.

४) केंद्रीय कार्यकारिणीचा कार्यवाह हा या प्रतिनिधीसभेचा निमंत्रक असेल.

बैठका – प्रतिनिधीसभेची वर्षातून किमान एक बैठक वार्षिक शिबिरापूर्वी होईल.
त्याआधी महत्त्वाच्या प्रश्नावर आवश्यक वाटल्यास एक किंवा दोन बैठका घेतल्या जातील.

परस्पर संबंध – केंद्रीय कार्यकारिणी ही, संघटनेच्या कामासंबंधी सूचना, नवी कार्यकारिणी व इतर संघटनात्मक बाबी प्रतिनिधीसभेसमोर मांडेल. प्रतिनिधीसभा त्यावर निर्णय घेईल.
हा आलेला निर्णय केंद्रीय कार्यकारिणीमार्फत वार्षिक शिबिरात सर्व कार्यकर्त्यांच्या संमतीसाठी मांडला जाईल व अंतिम निर्णय घेतला जाईल.

3. केंद्रीय कार्यकारिणी – महाराष्ट्र युक्रांदचे सर्व पूर्णवेळ कार्यकर्ते व इतर सामान्य कार्यकर्ते मिळून आजमितीला अकरा सदस्यांची केंद्रीय कार्यकारिणी बनेल. या कार्यकारिणीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा भरेल.

कार्यवाह, सहकार्यवाह – महाराष्ट्र युक्रांदच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांतून कार्यवाह व दोन सहकार्यवाह यांची निवड प्रतिनिधीसभा करेल.